# ठाणे महानगरपालिका, ठाणे
## जा हि र नो टी स

या जाहिर सूचनेव्दारे सर्व मालमत्ताधारकांना सूचित करण्यांत येते की, मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम 1949 मध्ये सुधारणा केल्यानुसार भांडवली मूल्यावर आधारीत मालमत्ता कराची आकारणी करुन, त्यानुसार बिले देण्याची प्रक्रिया सुरु आहे. तथापि या प्रक्रियेस विलंब लागत असल्याने, सन 2011-2012 या आर्थिक वर्षातील मालमत्ता कराची बिले "भांडवली मूल्यावर आधारित मालमत्ता करास अधीन राहून" निर्गमित करण्यांत आली आहेत.

यापूर्वी जाहिर सूचनेव्दारे सर्व मालमत्ताधारकांस असे सूचित करण्यांत आले होते की, सन 2011-2012 या आर्थिक वर्षातील मालमत्ता कराचे संपुर्ण बिल 15 जुलै,2011 पर्यत भरल्यास, दुस-या सहामाहिच्या मालमत्ता कराच्या बिलामध्ये 5% इतकी तसेच दिनांक 16 जुलै, 2011 नंतर भरल्यास प्रचलित पध्दतीनुसार सूट देण्यात येणार आहे असे प्रसिध्द करण्यांत आले होते.

या जाहिर सूचनेव्दारे सर्व मालमत्ताधारकांना सूचित करण्यांत येते की, आपले सन 2011-2012 या आर्थिक वर्षातील मालमत्ता कराचे संपुर्ण बिल 31 जुलै,2011 पर्यत भरल्यास, सदर बिलातील दुस-या सहामाहिच्या मालमत्ता कराच्या बिलामध्ये 5% इतकी सूट देण्यांत येईल. मात्र दिनांक 31 जुलै,2011 नंतर भरल्यास प्रचलित पध्दतीनुसार सूट देण्यांत येईल.

सही/-
अतिरिक्त आयुक्त,
ठाणे महानगरपालिका,ठाणे

मा.आयुक्त सो. यांचे मान्यतेने.